# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## निर्देश पत्र

विषय: नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकूण ३) दि. ०१/०९/२०२० रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त

फाईल क्रमांक: ____________

शाखा: ____________

---

संदर्भ: दि. ०१/०९/२०२० रोजी झालेली पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी

| दिनांक | कोणाकडे पाठविला | टीप व सूचना |
|---|---|---|
| ०१/०९/२०२० | मा. अप्पर जिल्हाधिकारी, नंदुरबार | दि. ०१/०९/२०२० रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे मराठी व इंग्रजी इतिवृत्त (प्रत्येकी ३ प्रती) मान्यतेसाठी सविनय सादर.<br><br>Sub - Regional Officer<br>M.P.C Board, Dhule |

## नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकूण 03) दि. ०१/०९/२०२० रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त

नंदुरबार जिल्ह्यातील खालील तक्त्यात नमूद केलेल्या शहादा तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकूण ०३) पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी दि. ०१/०९/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथुन व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारे घेण्यात आली.

| अ. क्र. | प्रस्तावित वाळू घाटाची ठिकाणे | तालुका | नदी | जवळचे गट क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | कौठळ त.सा. | शहादा | तापी | १/१, १/२ |
| २ | कु-हावद त.सा. | शहादा | तापी | १/१, १/२, १/३ |
| ३ | टेंभे बु. | शहादा | तापी | ३०३/१, ३०३/२, २९६/१, २९६/२, २९६/३ |

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२००८२४-FTS-००३८ दि.२४/८/२०२०अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, नंदुरबार - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - सदस्य

३) उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे - समन्वयक

सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) श्री. सुधीर खांदे
निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, नंदुरबार

२) श्री. अमर दुर्गुळे,
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक- (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे)

३) सौ. सौजन्या सु. पाटील
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे

सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर

लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, महसूल विभागाचे अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४/०९/२००६ व सुधारीत दि. ०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

नंदुरबार जिल्हयातील ०३ वाळू घाटांमधून वाळूचा उपसा करण्याकरीता प्रकल्पधारक मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी दि.२३/०७/२०२० रोजी शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी नमूद केले की, केंद्र शासनाच्या खनिजकर्म विभागाने मार्च २०१८ मध्ये Sand Mining Frame Work, 2018 प्रसिध्द केलेले आहे. त्यामध्ये वाळू/रेती निर्गती करताना आवश्यक असणाऱ्या बाबीं संदर्भात देशातील काही ठळक राज्यांचा अभ्यास करुन काही दिशा निर्देशक दिलेले आहेत. तसेच माननीय राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) यांनी ओ.ए.नं. ३६८/२०१५ मध्ये दिनांक १९/०९/२०१८ रोजीच्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याशी समन्वय साधून Sustainable Sand Mining Guidelines, 2016 व Sand Mining Frame Work, 2018 व २०२० नुसार धोरणात अनुकूल बदल करण्याचे व जनसुनावणी घेण्याचे निर्देश पारित केलेले आहेत.

समन्वयक यांनी असे नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

मप्रनि मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या मान्यतेनुसार दि. ०१/०९/२०२० रोजी नंदुरबार जिल्हयातील वाळू घाटांबाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आले. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि. २९/०७/२०२०रोजीच्या मराठी दैनिक लोकमत व इंग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणी बाबतच्या सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच अधिसुचनेप्रमाणे वाळू घाटासंबंधीचे ठळक वैशिष्ट असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती मराठी व इंग्रजीत शासनाच्या खालील कार्यालयामध्ये इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार.
२) जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार
३) जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार
४) तहसिल कार्यालय, शहादा, ता. शहादा जि. नंदुरबार.
५) उप-विभागीय कार्यालय, शहादा, ता. शहादा जि. नंदुरबार

६) ग्रामपंचायत कार्यालय -

(१) कौठळ त. सा. ता. शहादा जि. नंदुरबार.

(२) कु-हावद त. सा. ता. शहादा जि. नंदुरबार.

(३) टेंभे बु.ता. शहादा जि. नंदुरबार.

७) प्रादेशिक कार्यालय, *महाराष्ट्र प्रदूषण* नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.

८) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.

९) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.

१०) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स, नागपूर-४४०००१.

वैज्ञानिक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन तथा सचिव, राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती-१ यांनी त्यांच्या पत्र क्र. SEAC/२०१६/प्र. क्र. १/ तां. क. ३ दि. ०४/०५/२०२० अन्वये सध्या सुरु असलेल्या कोविड-१९ विषाणूच्या उद्रेकामुळे राज्यात शासनातर्फे करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सदरील जाहीर लोकसुनावणी ह्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे घेण्याबाबत सूचित केले होते.

जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी जनसुनावणीत सहभागी असलेल्या सर्वांना सांगितले की, नंदुरबार जिल्ह्याचा जिल्हा सर्वेक्षण अहवाल (DSR) मसुदा नंदुरबार जिल्ह्याच्या संकेतस्थळावर दि. 29/07/2020 रोजी जनतेच्या माहितीकरीता व अभिप्राय नोंदविण्याकरिता प्रसिध्द करण्यात आलेला असल्याचे दैनिक देशदुत व दैनिक नंददर्शन या वृत्तपत्राव्दारे जनतेस कळविण्यात आले होते.

तद्नंतर नंदुरबार जिल्हयातील ०३ वाळू घाटांबाबत श्री. प्रशील शुक्ला (Enviro Techno Consult Pvt. Ltd. Nagpur) यांनी प्रकल्पधारकाच्या वतीने प्रकल्पाचे सादरीकरण केले. तसेच वाळू उपसा करतांना प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

लोकसुनावणीचे संयोजक यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्तावीत वाळू घाटांबाबत एकही लेखी सुचना, हरकती, अर्ज प्राप्त झालेला नसल्याची माहिती दिली.

श्री. अमर दुर्गुळे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे प्रस्तावीत वाळू घाटांबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री. सुनिल श्रीकृष्ण कुवर, (सारंगखेडा)**— वाळूचा उपसा करण्या करीता पोकलेन मशिनचा वापर केला जाईल अथवा मजूरांव्दारे उपसा केला जाईल ? | **श्री. प्रशील शुक्ला** — वाळूचा उपसा केवळ मजुरांव्दारे कुदळ, फावडे वापरून करण्यात येईल. पोकलेन मशिन वापरण्यात येणार नाही. तसेच पाण्या खालील वाळूचा उपसा केला जाणार नाही. |
| २ | **श्री. निलेश मराठे, (नंदुरबार)**— वाळूची वाहतूक ट्रक व्दारे केली जाईल अथवा ट्रॅक्टर व्दारे केली जाईल? | **श्री. प्रशील शुक्ला** — वाळू निर्गती धोरण दि. ०३/०९/२०१९ अन्वये वाळू उपसा होत असलेल्या ठिकाणी ट्रक नेण्यास परवानगी नाही. वाळू घाटा पासून किमान ५०० मि. पेक्षा जास्त अंतरावर ठेकेदाराचा डेपो असेल. वाळू घाटापासून डेपो पर्यंत केवळ |

| | | |
|---|---|---|
| | | ट्रॅक्टर व्दारेच वाहतूक करण्यात येईल. डेपो पासून ग्राहकापर्यंत वाळूची वाहतूक ट्रक व्दारे केली जावू शकते. सर्व ट्रक्सला जीपीएस ट्रॅकींग यंत्रणा बसविण्यात येईल व तहसिलदार वाहतूकीवर पाहणी करू शकतील. |
| ३ | **श्री.निलेश मराठे, (नंदुरबार)**– वाळू घाटाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील का? | **श्री. प्रशील शुक्ला** – वाळू निर्गती धोरण दि. ०३/०९/२०१९ व मा. उच्च न्यायालय नागपूर यांच्या आदेशान्वये वाळू घाटाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे. तहसिलदार व जिल्हा संनियंत्रण समिती यांच्यातर्फे सीसीटीव्ही व्दारे वाळू घाटांची नियमीत पाहणी केली जाईल. |

लोक सुनावणीच्या संयोजक सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ धुळे व लोक सुनावणीचे अध्यक्ष श्री. सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, नंदुरबार यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केलेकी अजून कुणास आपले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

सौ. सौजन्या सु. पाटील यांनी नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्दयांची नोंद घेण्यात आली असल्याचे सांगितले. त्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने त्यांनी सर्वांचे आभार मानून जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (सौजन्या सु. पाटील)<br>समन्वयक<br>तथा<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>धुळे | (अमर दुर्गुळे)<br>सदस्य<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>नाशिक | 1-9-20<br>(सुधीर खांदे)<br>अध्यक्ष<br>तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी तथा<br>अपर जिल्हा दंडाधिकारी,<br>नंदुरबार |